# “नामांतर लढा शोध आणि बोध”




विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने केवळ राज्य घटनेचेच नव्हे तर आधुनिक धर्मनिरपेक्ष भारताचे शिल्पकार होत. ते जात, धर्म, पंथ, प्रांत, भाषा या कोणत्याही बंधनापलीकडचे विश्वव्याप्ती व्यक्तिमत्व होते. आधुनिक व धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे ते जनक होते. म्हणूनच आज राष्ट्राच्या सिमा ओलांडून ते मानवतेचे समतेचे ज्ञानविज्ञानाचे जागतिक आदर्श प्रेरणास्थान बनले आहेत.

मराठवाड्यासारख्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्वच आघाड्यावर मागास असलेल्या उपेक्षित प्रदेशात केवळ ‘ज्ञानविज्ञान’ म्हणजेच शिक्षणातूनच क्रांती घडू शकते हे ओळखूण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्चशिक्षणाची ज्ञानगंगा सर्वप्रथम मराठवाड्यात मिलिंदच्या रुपाने आणली. पुढे या प्रदेशासाठी स्वतंत्र ‘मराठवाडा विद्यापीठ’ ही निर्माण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवामुळे मराठवाड्यात ‘शिक्षणक्रांती’ घडत असतांना व त्यांच्या पदस्पर्शाने पूनीत झालेल्या परिसरात विद्यापीठ असल्यामुळे मराठवाडा विद्यापीठास त्यांचेच ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ’ असे नामांतर करावे यासंबंधी विविध विद्यार्थी संघटनांनी मागणी तथा आंदोलने केली. पुढे १९७८ मध्ये एकमताने विद्यापीठाच्या नामांतराचा ठरावही विधीमंडळात पारीत झाला परंतु त्याचे हिंसक पडसाद मराठवाडाभर पडायला सुरुवात झाली व नामांतराची प्रक्रियाही स्थगीत झाली.

१९९४ पर्यंत विविध आंदोलन, चळवळी, मोर्चे, निदर्शने, व्याख्यान, लॉंगमार्च, संमेलने, रास्तारोको, अशा विविध मार्गाने नामांतर लढा तब्बल १६ वर्ष लढला गेला. यात अनेकांनी हौताम्यही पत्करले. कर्मठ, सनातन तथा वर्णवर्गवर्चस्ववाद्यांनी ‘मराठवाडी’ अस्मितेतून केलेल्या विरोधात समता तथा मानवता मूल्य मानणाऱ्या आंदोलकांना बलिदानही पत्करावे लागले. यामुळे समाजकारण, राजकारण, इतिहास, साहित्य संस्कृती सर्वस्व समकालीन पर्यावरण ढवळून निघाले नामांतर लढ्याचे अत्यंत दूरगामी परिणाम केवळ मराठवाड्यातच नव्हे तर राज्य व राष्ट्रास भोगावे लागले.

शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, व्यावसायिक, साहित्यिक, दळणवळण व्यापार, कलानाट्य, संगीत अशा सर्वच आघाड्यावर नामातंर लढ्याचा प्रभाव पडला व समाजमन घुसळून निघाले या लढ्याचे चिंतन करतांना ‘‘नामांतर लढा शोध आणि बोध’’ या विषयी ISBN क्रमांक असलेला सर्वसमावेशक संशोधन ग्रंथ प्रकाशित करण्याचे योजिले आहे.

आपण खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर १५००-२००० शब्दमर्यादेत APS-DV-PRIYANKA, ISM or KRUTI DEV and TIMES NEW ROMAN या फॉन्ट साईजमध्ये namantar2018@gmail.com या इमेलवर निबंध / लेख दि. १० जानेवारी २०१८ पर्यंत पाठवावा.

आपणास ‘‘नामांतर लढा शोध आणि बोध’’ या दुर्मिळ व संशोधन मुल्यांचा ऐतिहासिक ठेवा असलेल्या संदर्भ ग्रंथाची किंमत ४५०/- असून आपणास तीन प्रती मोफत देण्यात येतील.

**‘‘नामांतर लढा शोध आणि बोध’’** हा ग्रंथ १४ जानेवारी २०१८ ला प्रकाशित होणार आहे.

## "नामांतर लढा शोध आणि बोध"

ग्रंथासाठी लेख/निबंध खालील विषयावर लिहावे.

१) प्राचीन मराठवाडा रुप व स्वरुप
२) मराठवाडा व संतपरंपरा
३) मराठवाड्याची सामाजिक/ राजकीय/ धार्मिक/ शैक्षणिक/ भौगोलिक सांस्कृतिक परंपरा.
४) निजामकालीन मराठवाडा/हैदराबाद संस्थांनचा मुक्ती लढा
५) मराठवाड्यातील उच्च शिक्षण वेध आणि वास्तव
६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा. (शिक्षण, सामाजिक, धार्मिक, धम्मविषयक, आंदोलने, चळवळ)
७) मराठवाडा विद्यापीठ व तत्कालीन शिक्षण व्यवस्था
८) "नामांतर लढ्याची सामाजिक/शैक्षणिक/राजकीय भूमी व पार्श्वभूमी.
९) नामांतरासंबंधीचे तत्कालीन विद्यार्थी आंदोलने रुप व स्वरुप
१०) नामांतर लढ्याचे राजकारण-समाजकारण
११) नामांतर लढ्याचे तत्कालीन वृत्तपत्रातील प्रतिबिंब
१२) नामांतर लढ्यातील सामाजिक/राजकीय/सांस्कृतिक नेतृत्व.
१३) नामांतर लढ्यातील औरंगाबाद/ नांदेड/ जालना/ परभणी/ लातूर/ उस्मानाबाद/ हिंगोली/ बीड व उर्वरित महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा सहभाग (कोणताही एक जिल्हा)
१४) नामांतर लढा व प्रशासनाची भूमिका
१५) नामांतर लढा व साहित्य (कथा/ कविता/ नाटक/ गीत/ चरित्र/ कांदबरी इ.)
१६) नामांतर लढा व साहित्य संमेलने
१७) नामांतर लढा व महाराष्ट्राचा वैचारिक संघर्ष
१८) नामांतर लढा व धर्मनिरपेक्ष विचारसरणी
१९) पथनाट्य, एकांकिका व नाटकातून साकारलेला नामांतर लढा.
२०) नामांतर लढ्याचे तत्कालीन जातीय/राजकीय भांडवल
२१) नामांतर लढा व विद्यापीठाचे आजचे भवितव्य
२२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सद्य:स्थिती व भवितव्य
२३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ : अध्यासन केंद्रे/पुतळे/राजकारण दशा आणि दिशा
२४) विद्यापीठाच्या शैक्षणिक व संशोधनात्मक विकासातील प्रयोग
२५) मराठवाड्याचा विकास व विद्यापीठांची भूमिका (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ/स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ/वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ)
२६) नामांतर लढ्याचे समर्थक/विरोधक व संधीसाधू राजकारण.
२७) नामांतर लढ्यातील महिलांचा सहभाग
२८) नामांतर लढ्यातील विरोधकांची भूमिका
२९) नामांतर लढ्यातील शहिदांच्या शौर्यगाथा
३०) नामांतर लढ्याची फलनिष्पती
३१) नामांतर लढ्यातील शिलेदार : व्यक्तिविशेष (एखाद्या लढवय्याचे चरित्रात्मक परीक्षण)

**टीप :** १) सदर ग्रंथातील लेख/शोधनिबंधा बाबत निबंध लेखक व्यक्तिश: स्वत: जबाबदार राहतील. त्यांच्या मताशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक वा मुद्रक जबाबदार असणार नाहीत याची नोंद घ्यावी.

२) शब्द मर्यादेत नसणारे पाल्हाळिक लेख/निबंधाचे संपादन/संक्षिप्त करण्याचा अधिकार संपादक मंडळास राहील.

## Fees : ₹ 1000

**(ग्रंथाची किंमत ४५०/- असून आपणास तीन प्रती मोफत देण्यात येतील.)**

**PAYMENT MODE**

Fees along with Cash/ Account/Cheque/Demand Draft Drawn in favour and send to **"Ajanta Prakashan"** Jaisingpura, Near University Gate, Aurangabad (M.S.)

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | Ajanta Prakashan |
| Account No. | : | 32856592267 (State Bank of India) |
| IFS Code | : | sbin0007919 |
| Branch | : | Samarth Nagar, Auragabad. (M.S.) |

**Mail on : namantar2018@gmail.com**

**www.ajantaprakashan.com**

**Contact : Vinay S. Hatole - 9579260877**

**Tell Phone : (0240) 2400877**